ISSN-2321-211X 256


# RESEARCH PROCESS

**International Journal of the Social Research Foundation**

INC - DEIS January 2020 Special Issue Volume II

**UGC Approved**

**Peer Reviewed and Refereed Journal**



Social
RESEARCH FOUNDATION

RESEARCH PROCESS
International Journal of The Social Research Foundation
INC-DEIS 2020 Special Issue: Volume II

258

## ARTICLES

१ निवडणुक प्रक्रियेतील सुधारणाविषयीचा समाजशास्त्रीय अभ्यास : शिरूर का. तालुक्याच्या संदर्भात
— *सुधीर येवले* १

२ संस्कृती व पर्यावरण यामधील सहसंबंध
— *अरूणा सावरगावकर* ७

३ कृषी क्षेत्राच्या विकासात शासकीय विहीर अनुदान योजनेचे योगदान (विशेष संदर्भ—फुलंब्री तालुका)
— *मंजुषा मोतीराम नळगीरकर* १४

४ भटक्या—विमुक्त जातींचे उध्दारकर्ते: राजर्षी शाहू महाराज
— *सुरेश वि. धनवडे* २५

५ जागतिक प्रदुषण : आंतरराष्ट्रीय संघटना आणि भारत
— *कल्पना एम. कदम* ३०

६ महाराष्ट्राचा औद्योगिक विकास: एक दृष्टिक्षेप
— *माधवराव नरसिंगराव बिरादार* ३५

७ आदिवासीचा समकालीन विकास आणि समस्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण
— *रिटा मालचे* ४०

८ पर्यावरण प्रदुषणाची कारणे व उपाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास
— *डाके राजाभाउ आसाराम आणि सुधीर येवले* ५२

९ गोंड आदिवासी महिलांचे सांस्कृतिक जीवन
— *श्रीमती के.बी.फोले आणि डॉ.रामचंद्र भिसे* ५७

१० भारतीय लोकशाहीतील आधुनिक दबावगटांची भूमिका
— *द्वारकाप्रसाद वि. वायाळ* ६२

११ आदिवासी समाजातील व्यसनाधिनतेचे चिकित्सक अध्ययन (विषेश संदर्भ किनवट तालुका)
— *राठोड वसंत भाऊराव,* ६७

260

*Research Process ISSN 2321-211X*
**INC-DEIS 2020 Special Issue: Volume II, pp. 57-61**
**© Social Research Foundation**

# गोंड आदिवासी महिलांचे सांस्कृतिक जीवन

**के.बी. फोले**
**रामचंद्र भिसे**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
दिंगबरराव बिंदु महाविद्यालय,
भोकर जि.नांदेड.
**Email:**

*आपल्यासारखीच भूक इतरानाही लागू शकते याचा विचार करुन आपल्यातलेच दोन घास इतराना देणे, ही आहे गोंड आदिवासींची आदर्श संस्कृती. तर अशा या गोंड आदिवासी महिलाची संस्कृती नेमकी कशी आहे ? त्यांचे रीतीरिवाज, रुढी, परंपरा कोणत्या आहेत ! याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधातून करण्यात आला आहे. आजच्या आधुनिक जगातील महिलांचे, त्यांच्या जगण्याचे अवलोकन केल्यास ह्या महिला जीवनातील निखळ आनंदाला पारख्या झालेल्या दिसतात.*

***[Key Words:** गोंड, आदिवासी जमात, शिक्षण, कुपोषण]*

**प्रस्तावना** :

भूक लागली की खाणे म्हणजे प्रकृती, भूक नसताना खाणे म्हणजे विकृती आणि......

आपल्यासारखीच भूक इतरांनाही लागू शकते याचा विचार करुन आपल्यातलेच दोन घास इतरांना देणे, ही आहे गोंड आदिवासींची आदर्श संस्कृती. तर अशा या गोंड आदिवासी महिलांची संस्कृती नेमकी कशी आहे ? त्यांचे रीतीरिवाज, रुढी, परंपरा कोणत्या आहेत ! याचा विचार प्रस्तुत शोधनिबंधातून करण्यात आला आहे.

आजच्या आधुनिक जगातील महिलांचे, त्यांच्या जगण्याचे अवलोकन केल्यास ह्या महिला जीवनातील निखळ आनंदाला पारख्या झालेल्या दिसतात. परंतु आजही आधुनिक प्रगत समाजापासून दूर दरी—खोऱ्यात पाडयावर राहणारी गोंड आदिवासी महिला कसे जीवन जगत असेल याची केवळ कल्पना केलेली बरी, पण तरीही त्या आनंदी दिसतात. जीवनातील कठीण प्रसंगातसुद्धा त्या निखळ आनंद मानतात. त्या आपल्या पोटासाठी रानावनात अनवाणी पायाने कंदमुळे शोधत फिरतात, दिवसभर शेतात राबतात, पोटाची खळगी भरण्यासाठी जंगलात भटकून सरपण गोळा करतात, म्हणजेच जीवनाचा प्रत्येक क्षण त्या संघर्षमय रीतीने जगतात. त्यांच्याही जीवाला यातना होत असतीलच ना ! त्यांनाही मन आहे, भावना आहेत, पण त्यांच्या भावनांना ह्या भावनाशून्य जगात किंमत देणार कोण? त्यांची आर्त हाक ऐकणार कोण ! पण तरीही अतोनात काबाडकष्ट करणारी ही गोंड आदिवासी महिला प्रतिकूल परिस्थितीतही जीवन जगताना रडत बसत नाही, तर प्राप्त परिस्थितीशी चार हात करत ती आपले जीवन आनंदाने जगते, तिच्या आनंदी जीवनाचे गमक काय? या गोष्टींचा विचार करता त्यांनी आपल्या जीवनात जपलेल्या 'सांस्कृतिक वैभवाचा' विचार करावा लागतो. यामध्ये प्रामुख्याने 'आदिवासी लोकसाहित्य' व 'आदिवासी लोककला' यांचा समावेश होतो. 'गोंड' आदिवासी महिला ही रोजच 'लोकसाहित्यात' जगते. रोज सकाळी लवकर उठणारी गोंड आदिवासी महिला सर्वप्रथम

चूल पेटविताना देखील प्रथम आपल्या चुलीला 'पोचारा' फिरवते. चुलीवर शिजवलेल्या अन्नाचा एक घास अग्नीदेवाला समर्पित करते आणि मग सर्वांनी अन्नाचे सेवन करावे हा दंडक ती स्वतःपासून सर्व कुटुंबियांना घालून देते. ही संस्कृती पाहताना, ऐकताना नागरी समाजाला कदाचित वेडेपणाही वाटेल, परंतु ही वस्तुस्थिती आहे. अन्नदेवता प्रसन्न राहण्यासाठी अग्नीला अन्न दिल्याने घरात सुखसमाधान लाभते असल्या दैवी धारणांवर तिचे जीवन सकाळ पासूनच सुरु होते.

गोंड आदिवासी महिलेच्या जगण्यात भोळेपणा व सहजता आहे. सत्याची कास व प्रामाणिकपणा तर त्यांच्या रक्तातील अनुवंशिकतेतून दर्शविते. कमी साधनसामग्री, अल्प अर्थार्जन व आहे त्यात समाधान मानून जगण्याची वर्तमानकालीन वृत्ती त्यांच्या आनंदी जीवनाचे गमक आहे. आपल्या रुढी, प्रथा, परंपरा, रीतीरिवाज, यांना गोंड आदिवासी महिलांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. जन्मापासून ते जीवनाच्या अंतापर्यंत त्या जे जगतात, त्या जगण्याचे आविष्करण त्यांच्या ठायी होते.

गोंड आदिवासी महिला ही रुढी, परंपरा यांची पाईक आहे. गोंड आदिवासींची संस्कृती आणि जीवनमूल्ये वेगळी आहेत. आपले वेगळेपण, सांस्कृतिक मूल्ये जपण्यासाठी त्या शांतपणे, एकाकी, दऱ्याखोऱ्यात, पाडयावर अलगपणे राहतात म्हणून त्यांचा एकांतपणा हा बुजरेपणा होवू शकत नाही. 'स्वाभिमान, विश्वास आणि सत्याचरण,' या त्रितत्वावर गोंड आदिवासी समाजाची बैठक भक्कम पायावर उभी आहे.

निसर्गाच्या जीवनाशी आपले जीवन जुळवून घेणे हा गोंड आदिवासींचा आदिधर्म आहे; म्हणूनच त्यांच्या दैवी संकल्पना व धर्मकल्पना निसर्ग सापेक्ष आहेत. डोंगरदऱ्या, दगडमाती, झाडे–झुडपे, पाखरे, वन्यपशू, नद्या ही त्यांची आद्य कुळदैवत आहेत. जमीनीला तर ते आपली माता समजतात. तिची पूजा करतात. या धरतीमातेला येता–जाता आपले पाय लागतात; म्हणून तिच्या विषयीचा कृतज्ञताभाव व्यक्त करताना वारली आदिवासी एका लोकगीतात म्हणतो–

" अथं नाचू का कोठ रं नाचू  
धरतरीच्या पाठीवर  
धरती माझी मायूरं  
तिला मी पाय कसा लावू रं  
अथं नाचू का कोठ रं नाचू  
कणसरीच्या माथ्यावर  
कणसरी माझी मायूरं  
तिला मी पाय कसा लावू रं

अशा प्रकारे निसर्गाप्रती कृतज्ञता व मानवी मूल्यांनी भरलेली उदात्त संस्कृती फक्त गोंड आदिवासीमध्येच आहे.

दुर्गम आणि दऱ्याखोऱ्यात पाडयावर राहणाऱ्या गोंड आदिवासी महिलांनी 'आपली लोकसंस्कृती' जपली आहे. जशी नागर समाजात 'वेदसंस्कृती' आहे तशीच गोंड आदिवासींची ही लोकसंस्कृती त्यांच्या जीवनात उभारी देण्याचे कार्य हजारो वर्षापासून करीत आलेली आहे. निसर्गपूजेला त्यांच्या जीवनात महत्वाचे स्थान आहे. मानवी आरोग्य आणि जीवनातील सौख्य यांसाठी ते जादू–टोणा, मंत्र–तंत्र, भूत–पिशाच्च, दैवी नैसर्गिक कोप, नैसर्गिक कृपा यांवर विश्वास ठेवून स्वच्छंदी जीवन जगत असतात.

**समस्या अध्ययनाचे महत्व :–**

गोंड आदिवासी जमातीची नागर समाजापेक्षा वेगळी असलेली संस्कृती, त्यांचा गौरवशाली इतिहास, निसर्गावलंबी जीवनसरणी इत्यादी घटकांचा बारकाईने अभ्यास करणे हा या अध्ययनाचा प्रमुख उद्देश आहे.

गोंड आदिवासी महिलांच्या उपजिविकेचे साधन शेती, मजुरी आणि जंगलकामे हेच प्रामुख्याने आहेत. शेती व्यवसाय करणाऱ्यात स्वतःच्या मालकीची शेती करणारे, कुळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजूर दिसून येतात.[9] शेतमजूरी करणाऱ्या काही महिला बिगर आदिवासींच्या शेतावरही अवलंबून राहतात.

**'गोंड' आदिवासी महिलांच्या अर्थव्यवस्थेचे वर्गीकरण :**

**१) शेती** : 'गोंड' आदिवासी महिलांचा प्रमुख व्यवसाय हा शेतीच आहे. या शेतीमधून त्या खरीपाच्या हंगामामध्ये कापूस, ज्वारी, तूर, बाजरी, उडीद, मूग, चवळी ही पिके घेतात. त्यांची शेती करण्याची पध्दती पारंपारिक असल्यामुळे उत्पन्न म्हणावे तेवढे मिळत नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते किंवा अर्धपोटी जीवन जगावे लागते. परिणामतः गोंड आदिवासी महिलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**२) पशुपालन व कुकुटपालन** : किनवट तालुक्यातील गोंड आदिवासी महिलांकडे थोड्याफार प्रमाणात पशुधन आहे. त्यात शेळया, बैल, म्हशी, गाय, कोंबडया इत्यादींचा समावेश होतो. कोंबडया व शेळया त्यांच्यासाठी आर्थिक प्राप्ती करुन देणारे महत्वाचे साधन आहेत. बहुतेक कुटुंब कोंबडया व शेळया विकून आपल्या घरातील किरकोळ खर्च भागवितात. मोठया प्रमाणात अडचण आली तर गाय, बैल, यांची विक्री करुन आर्थिक प्रश्न सोडवतात.

**शिफारशी** :

१. 'गोंड' आदिवासींच्या रुढी, परंपरा, प्रथाशी मेळ घालून नवीन कौशल्य प्रदान करणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना स्वयंप्रेरित करुन विकास योजनांच्या कार्यात सहभागी करुन घेणे.

२. 'गोंड' आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने त्यांच्यात शिक्षणविषयक जागृती व प्रचार करणे आवश्यक आहे जेणेकरुन त्या शिक्षण घेवून मुख्य प्रवाहात येवू शकतील.

**निष्कर्ष** :

१. गोंड आदिवासी महिलांचे आर्थिक जीवन निकृष्ट दर्जाचे आहे, पण सांस्कृतिक जीवन मात्र वैभवसंपन्न आहे.

२. 'गोंड' आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून त्याचे कारण दैनंदिन घरकाम व शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा हे आहे.

३. 'गोंड' आदिवासी महिला आर्थिकदृष्टया जरी मागासलेली असली तरी वैचारिक दृष्टया ती कधीच मागास नव्हती, नाही आणि राहणारही नाही.

**References:**


गावित माहेश्वरी (२०१५) 'पारंग' स्मरणिका (१० वे आखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नांदेड आखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आणि आदिवासी साहित्य व संस्कृती मंडळ, महाराष्ट्र

गारे गोविंद, (संपा), (१९९९) आदिवासी विकास योजना, महाराष्ट्र आदिवासी दर्शन, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे पृ.क्र. ०६


[The final revised version of this paper was received on 18 January 2020]

गोंड आदिवासी स्त्रियांचे सांस्कृतिक जीवन, त्यांचे रीतीरिवाज, रुढी, प्रथा, परंपरा नेमक्या कोणत्या आहेत ! हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत अध्ययन करण्यात आले आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टये –**

१. 'गोंड' आदिवासी महिलांच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचा अभ्यास करणे.
२. 'गोंड' आदिवासी महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दर्जाचा आढावा घेणे.

**गृहितके –**

१. 'गोंड' आदिवासी महिलांचे आर्थिक जीवन निकृष्ट दर्जाचे आहे, पण सांस्कृतिक जीवन मात्र वैभवसंपन्न आहे.
२. 'गोंड' महिलामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे.
३. 'गोंड' आदिवासी महिला आर्थिकदृष्टया जरी मागासलेली असली तरी वैचारिकदृष्टया ती कधीच मागास नव्हती, नाही आणि राहणारही नाही.

**आदिम संस्कृती :**

आदिमता म्हणजे मानवी जीवनाची प्राचीनतम निसर्गाश्रयी जीवनावस्था होय.

मानवी जीवनाची ही प्राचीनतम निसर्गाश्रयी जीवनावस्था अवशेषात्मकतेने आज 'गोंड आदिवासी' म्हणविल्या जाणाऱ्या समाजात पहावयास मिळते. आदिम जीवनाच्या वैशिष्टयांसह गोंड आदिवासी जमातीतील बहुतांशी लोकजीवन हे वन्यपर्यावरणाशी, शेतीनिष्ठेचे व अतिव काबाडकष्टाचे असते. निसर्गावलंबी व कष्टमय जीवन यामुळे त्यांच्या जीवनाला करुणा आणि समाधान या संवेदना अधिक चिकटलेल्या असतात. मानवाबरोबरच पशूपक्षी, प्राणी, वनस्पती यांच्यावर प्रेम करणे, त्यांच्याकडे समानतेच्या दृष्टिकोनातून पाहणे याचे बाळकडू 'गोंड' आदिवासींना लहानपणापासूनच मिळालेले असते. त्यांच्या बालवयातच हे संस्कार बिंबवले जातात. त्यामुळे त्यांच्या मनाची जडणघडण अशीच झालेली दिसते. जंगल, प्राणी, वनस्पती आणि एकूणच पर्यावरण यांचे रक्षण कसे करायचे ? हे 'गोंड' आदिवासींना कोणी सांगण्याची गरज नाही. निसर्गावलंबी जीवनसरणी आजही गोंड आदिवासी जमातीत घट्टपणे अस्तित्वात असलेली दिसते.

**गोंड आदिवासी महिलांची धार्मिक कल्पना :–**

'गोंड' आदिवासी महिलांच्या धार्मिक कल्पनांमध्ये प्रामुख्याने निसर्गपूजा आहे. प्रत्येक चराचर वस्तुमध्ये चैतन्य आहे, असे मानून त्या शक्तीची ह्या महिला पूजा करतात. नृत्यही याच शक्तीची देणगी असल्याने 'अनाकलनीय' शक्तींना प्रसन्न करण्याचे साधन म्हणून नृत्याकडे पाहतात. सर्व शक्तीमान निसर्गावरच जीवन अवलंबून असल्याने त्याला संतुष्ट ठेवावे या भावनेने केली जाणारी पवित्र कृती म्हणजे नृत्य अशी 'गोंड' आदिवासी महिलांची धारणा दिसून येते. 'गोंड' आदिवासी महिलांच्या नृत्यसंकल्पनांत चैतन्य आहे. निसर्गातील शक्ती आणि चैतन्य यांचा मिलाफ त्यात दिसून येतो. आई, मुलगी, नात अशा तीनही पिढया एकत्र उत्साहाने नाचतात. 'गोंड' आदिवासी संस्कृतीच्या जडणघडणीत निसर्गाचा फार मोठा वाटा आहे. 'गोंड' आदिवासी महिला जिथे वास्तव्य करतात त्या भागातील नैसर्गिक व सामाजिक वातावरण म्हणजे डोंगरदऱ्या, नदीताले, पशूपक्षी, वृक्षवेली, सणोत्सव, नाचगाणी, बाजार, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, जमातपंचायत जत्रायात्रा, लोकसमजुती, संकेत देव देवता, शेतीचे हंगाम या सगळयांचा ठसा हया 'गोंड' आदिवासी महिलांच्या कलाजीवनावर (सांस्कृतिक जीवनावर) जाणवतो.

**गोटूल :–**

'गोंड' माडिया जमातीतील 'गोटूल' हे सांस्कृतिक केंद्र. इथे आदिवासी युवक–युवतींना रीतीरिवाज, परंपरा, संगीत, नृत्य, शिकार, या बरोबरच लैंगिक शिक्षणही दिले जाते. आदिवासेत्तर लोकांनी मात्र या 'गोटूल' कडेही व्याभिचाराचे, स्वैराचाराचे केंद्र

म्हणून पाहिले 'गोटूल' मध्ये एकमेकांना पसंत केलेले तरुण--तरुणी आयुष्यभर एकमेकांशी विश्वासार्हतेने व एकनिष्ठेने राहतात. एकमेकांना फसवत नाहीत.

अशा पद्धतीने 'गोंड' आदिवासी संस्कृतीचे जे विकृतीकरण केले गेले आहे, याविषयी आता संशोधकांनी सजग होण्याची गरज आहे. 'गोंड' आदिवासी संस्कृतीचे मूळ स्वरुप आपल्या संशोधनातून सर्वांच्यांपुढे मांडण्याची गरज तीव्रतेने जाणवत आहे; म्हणूनच 'गोंड' आदिवासी संस्कृतीवर होणारा हा हरामखोरी हल्ला थांबविण्याच्या उद्देशानेच प्रस्तुत अध्ययन केलेले आहे.

**'गोंड' आदिवासींचा गौरवशाली इतिहास** –

शूर–वीर गोंड आदिवासी स्त्री–पुरुषांच्या रक्ताने लिहिल्या गेलेल्या इतिहासाची जी तेजस्वी पाने भारतीय इतिहासात उपेक्षित राहिलीत, त्यांची देखील आठवण करुन देणे गरजेचे वाटते. ज्यामध्ये अनेक 'गोंड' आदिवासी स्त्री–पुरुषांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यामध्ये प्रामुख्याने क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा, रघुनाथ शहा, शंकर शहा, बाबुराव शेडमाके, कुमरा भिमू, श्यामा कोलाम आदी क्रांतीकारकांचे योगदान महत्वाचे आहे. याशिवाय 'गोंड' आदिवासी स्त्रियाही यात मागे नव्हत्या. राणी दुर्गावती, झलकारीबाई, राणी हिराई, राणी पद्मावती, राणी मिनगीदयी, राजकुमारी चमेली अशा कितीतरी गोंड आदिवासी स्त्रियांनी रणभूमीवर आपले कर्तृत्व गाजविले.

गोंड आदिवासींचा इतका उज्जवल, उद्दात्त, गौरवशाली, सुवर्णाक्षरात लिहून ठेवावा असा दैदिप्यमान इतिहास आहे.

**मातृसत्ताक समाज व्यवस्थेच्या वारसदार; गोंड आदिवासी महिला** :

गोंड आदिवासींमध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षाही महत्वाचे स्थान आहे. 'गोंड' आदिवासी स्त्रिया ह्या मातृसत्ताक समाज व्यवस्थेच्या वारसदार आहेत. गोंड राज्यकर्त्या महिलांनी राज्याचा कारभार समर्थपणे सांभाळलेला आहे. ब्रिटिशांविरुद्धच्या उठावामध्ये गोंड आदिवासी स्त्रियाचा प्रामुख्याने सहभाग राहिलेला आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, माणुसकी, सहकार्याची भावना, स्त्रियांना समान दर्जा या गोष्टी गोंड आदिवासी समाजात दिसून येतात म्हणूनच सांस्कृतिक दृष्टया मुख्य प्रवाह आदिवासींचा आहे.

**जगाला आदर्शवत ठरणारी संस्कृती** :

'गोंड' आदिवासी संस्कृती ही जगाला आदर्शवत ठरणारी आहे. कारण गोंड आदिवासींमध्ये

१. 'गोंड' आदिवासी महिलांना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.
२. 'गोंड' आदिवासींमध्ये हुंडाप्रथा नाही, याउलट मुलींनाच दहेज, वधूशुल्क, दिले जाते.
३. 'गोंड' आदिवासींमध्ये आजही बऱ्याच अंशी मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात आहे.
४. नवऱ्याशी पटत नसेल तर सहजपणे जमातीतील पंचायतीच्या साक्षीने काडीमोड (घटस्फोट) घेण्याचा अधिकारही गोंड आदिवासी महिलेला आहे.
५. बालविवाह, स्त्रिभ्रुणहत्या, या समस्या गोंड आदिवासींमध्ये नाहीत.
६. 'गोंड' आदिवासींमध्ये विधवा विवाह संमत आहे. स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार आहे. त्यामुळे प्रगत समाजात होणारी स्त्रियांची घुसमट इथे नाही.[२]

**'गोंड' आदिवासी महिलांचे शिक्षणाचे प्रमाण** :

'गोंड' आदिवासी स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. राजकारणात तर त्यांची वाटचाल अतिशय संथगतीने चालू आहे. हे आजचे वास्तव आहे. 'गोंड' आदिवासी महिलांचा इतिहास पाहता महिलांनी स्वातंत्र्यासाठी लढताना आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. आपल्या शौर्याने रणभूमी गाजवली आहे. समर्थपणे राज्यकारभार सांभाळला आहे आणि आपला हाच आदर्श समोर ठेवून गोंड आदिवासी स्त्रियांनी राजकारणात अधिकाधिक सक्षम होणे आवश्यक आहे.

**गोंड आदिवासी महिलांची आर्थिक स्थिती** :